सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २०९ | मंगळवार, दि. २१ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





श्री. राजू चौधरी
कंडक्टर



श्री. सुहास बोरकर
अमळनेर

# ताई, माई, आप्पा...
# बघा, या दोन्ही दादांच्या गुलू गुलू गप्पा...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आमदार अनिलदादा पाटील आणि माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांच्यातील राजकीय वैमनस्य सर्वांनाच माहीत आहे. मात्र, मोठी माणसे मोठ्या विचारांनी आणि मोठी समज ठेवूनच मोठी होतात, याचे प्रत्यंतर या दोन्ही दादांच्या बाबतीत नुकतेच आले आहे. संत श्री सखाराम महाराज यात्रोत्सवाच्या स्तंभारोपणाप्रसंगी दोन्ही दादा उपस्थित होते. दोघांमध्ये आमच्यात जणू काही झालेच नाही अशा आविर्भावात सकारात्मक विषयांवर गप्पा झाल्या. स्वभावाने आधीच शांत असलेले प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांचा थोडा सँडविच झाला होता. मात्र, त्यांनी तो चेहऱ्यावर दिसू दिला नाही. राजकारण हे राजकारणाच्या ठिकाणी असते; पण जेव्हा समाजकारण आणि विकासाचा संदर्भ येतो तेव्हा वैयक्तिक मान–अपमान व वैमनस्य बाजूला सारावे लागते. त्यातूनच आपले मोठेपण व उत्तरदायित्व सिद्ध होते, हेच या दोन्ही दादांनी दाखवून दिले आहे.

आता दोन्ही दादांच्या किमान खालच्या फळीच्या कार्यकर्त्यांनी उठसूट उगाच जास्त वातडे होण्यात अर्थ नाही...!



## दिनविशेष
२१ एप्रिल

- भारतीय नागरी सेवा दिन
- जागतिक क्रिएटिव्हिटी आणि इनोव्हेशन दिन
- भारताचे १२ वे पंतप्रधान म्हणून डॉ. इंद्रकुमार गुजराल यांनी पदभार स्वीकारला

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा–जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा–तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!
जय स्वदेशी...!!

# पानंद रस्ते, पाणीटंचाईवर गांभीर्याने चर्चा
## आमदार अनिलदादा पाटलांकडून कामांचा सखोल आढावा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेरः तालुक्यातील विकासकामांना वेग देण्यासाठी आमदार अनिलदादा भाईदास पाटील यांनी पुढाकार घेतला असून, 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते' योजनेचा सखोल आढावा घेतला. आगामी उन्हाळ्याची दाहकता पाहता पाणी टंचाई निवारणासाठी त्यांनी थेट आदेश दिले असून, टँकरचे प्रस्ताव ४ दिवसांत निकाली काढण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत.

नागरिकांना कोणतीही अडचण भासू नये यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देश देण्यात आले, विशेषतः टँकर मागणी संदर्भात प्राप्त झालेल्या तसेच येणाऱ्या सर्व प्रस्तावांना केवळ चार दिवसांच्या आत मंजुरी देण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना देत प्रशासनाला गती देण्यावर भर देण्यात आला.



*अमळनेर : तालुक्यातील विकासकामांना वेग मिळावा याकरिता आमदार अनिलदादा पाटील यांच्या उपस्थितीत बैठक झाली. यावेळी प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रूपेशकुमार सुराणा,पारोळ्याचे तहसीलदार डॉ. उल्हास देवरे , गटविकास अधिकारी एन. आर. पाटील, उपअधीक्षक भूमी अभिलेख विजयकुमार देवरे, गटविकास अधिकारी भूषण कदम आदी.*

यामुळे शेतकरी व ग्रामस्थांना दिलासा मिळणार आहे.सदर बैठकीत विविध विभागांचे अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, कृषी, बांधकाम, भूमी अभिलेख, पोलीस प्रशासन तसेच पंचायत समितीचे अधिकारी यांनी आपापल्या विभागाचा आढावा सादर केला. समन्वयातून कामे जलदगतीने पूर्ण करण्यावर सर्वांनी एकमत व्यक्त केले. तसेच समिती सदस्य व ग्रामस्थ प्रतिनिधी आपल्या भागातील अडचणी मांडल्या, त्यावर आमदारांनी सकारात्मक भूमिका घेत तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

सदर बैठकीत उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रूपेशकुमार सुराणा, तहसीलदारडॉ. उल्हास देवरे , गटविकास अधिकारी एन. आर पाटील, उपअधीक्षक भूमी अभिलेख विजयकुमार देवरे, गटविकास अधिकारी भूषण कदम, नीना बाविस्कर, वैशाली जडे, पोलीस उपनिरीक्षक प्रकाश चव्हाण, महेश जाधव, ए. जे. परदेशी, जितेंद्र बुवा, वाय.ए. वंजारी, ए.आर कोठावदे, एस.पी. गावित, एस.बी.देसले, एम.डी चव्हाण, एच.के. पाटील, पी.ए. पाटील, गांगुर्डे साहेब, एस.व्हि. पाटील, सिसोदे, रिता बाविस्कर , गौरव उदय पाटील, चेतन काशिनाथ पाटील, महारु आत्माराम पाटील, सुरेश देवचंद पाटील, ललित भूपेंद्र बाविस्कर आदी उपस्थित होते. ▲

# अक्षय्य तृतीयेनंतर सोने, चांदी स्वस्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : शहरातील सुवर्ण बाजारपेठेत अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सोने, चांदी दरात काहीअंशी घट नोंदवली गेल्याने साडेतीन मुहूर्तावर दागिने करणाऱ्या ग्राहकांना थोडा दिलासा मिळाला होता. सलग दुसऱ्या दिवशी सोमवारी सकाळी बाजारपेठ उघडल्यावर दोन्ही धातुंचे दर आणखी कमी झाल्याचे दिसून आले.यंदाची अक्षय तृतीया सोन्याच्या उच्च किमतींमुळे जास्त चर्चेत राहिली.

मागील वर्षाच्या तुलनेत सोन्याचे दर सुमारे ६१ टक्यांनी वाढल्याने मुहूर्ताच्या खरेदीवर परिणाम झाल्याचे स्पष्टपणे दिसून आले. भारतात अक्षय तृतीया हा सोन्याच्या खरेदीसाठी अत्यंत शुभ दिवस मानला जातो. धनत्रयोदशीनंतर हा दुसरा सर्वात मोठा सोने खरेदीचा सण असतो. मात्र, यावर्षी वाढत्या दरांमुळे ग्राहकांनी सावध भूमिका घेतल्याचे चित्र बाजारात दिसले. यंदा दागिन्यांच्या विक्रीत अपेक्षित वाढ नोंदवली गेली नाही. अनेक ठिकाणी ग्राहकांची उपस्थिती होती, परंतु खरेदीचे प्रमाण मर्यादित राहिले.

विशेषतः मोठ्या आणि जड दागिन्यांऐवजी हलक्या वजनाच्या दागिन्यांना मागणी वाढल्याचे दिसले. काही ग्राहकांनी खरेदी पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. आंतरराष्ट्रीय पातळीवरील घडामोडींचाही सुवर्ण बाजारपेठेवर मोठा प्रभाव पडताना दिसत आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढता तणाव तसेच होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील हालचालींमुळे जागतिक बाजारपेठेत अनिश्चितता निर्माण झाली आहे.

(पान २ वर...)




*अमळनेर: समस्त ब्राह्मण समाजाच्या वतीने भगवान परशुराम यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित नगरसेविका सौ. कल्पना शर्मा व माजी नगरसेवक मुन्नाभाऊ शर्मा यांच्यासह समाजबांधव.*

# अमळनेरमध्ये ब्राह्मण सामाजातर्फे भगवान परशुराम जयंती साजरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील समस्त ब्राह्मण समाजातर्फे अक्षय तृतीयेच्या औचित्याने भगवान परशुराम जयंती अत्यंत उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. शहराच्या मध्यवर्ती भागातील भगवान परशुराम चौक येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले ते भगवान परशुरामांचा मंगलमय रुद्राभिषेक. हा विधी नगरसेविका सौ. कल्पना शर्मा व माजी नगरसेवक श्री. मुन्नाभाऊ शर्मा यांच्या हस्ते शास्त्रोक्त पद्धतीने संपन्न झाला. पुरोहितांच्या मंत्रोच्चाराने आणि 'भगवान परशुराम की जय'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात दुमदुमून गेला.या प्रसंगी ब्राह्मण समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये डॉ. शशांक जोशी, पी. जे. जोशी , श्री. हरिभाऊ जोशी यांच्यासह समाजातील असंख्य अबालवृद्ध बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरवर्षीप्रमाणे यंदाही परशुराम जयंतीनिमित्त चौकात आकर्षक सजावट करण्यात आली होती. रुद्राभिषेकानंतर भाविकांनी भगवान परशुरामांचे दर्शन घेऊन पूजन केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ब्राह्मण समाजातील कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. ▲

# आयुष्याला वाट करून देणाऱ्या देवाला वाटेवर ठेवून त्याचीच वाट लावणाऱ्या महाभागांचा फरशी पुलावरील प्रताप...!

## सामाजिक संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह; पालिकेने लक्ष पुरविणे गरजेचे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील विविध भागांत अलीकडच्या काळात देवतांच्या मूर्ती रस्त्यावर, कचराकुंड्यांजवळ किंवा फरशी पुलासारख्या ठिकाणी टाकून दिल्याच्या घटना वाढताना दिसत आहेत. श्रद्धा, संस्कृती आणि परंपरेचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या या मूर्तींचा अशाप्रकारे अवमान अर्थात विटंबना होत असल्याने हा प्रकार म्हणजे सामाजिक संवेदनशीलतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा आहे. किंबहुना आयुष्याला वाट करून देणाऱ्या देवाला वाटेवर ठेवून त्याचीच वाट लावणाऱ्या महाभागांकडूनच हा प्रताप घडलेला असण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



*अमळनेर : श्रद्धा, संस्कृती आणि परंपरेचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या देवाच्या मूर्तींची अशाप्रकारे विटंबना येथील फरशी पुलावर होताना दिसत आहे.* **(छायाचित्र : गणेश सपकाळे)**

काही ठिकाणी घरातील जुन्या किंवा तुटलेल्या, फुटलेल्या मूर्ती योग्य पद्धतीने विसर्जित करण्याऐवजी त्या थेट रस्त्यावर टाकल्या जात आहेत. विशेषतः सण–उत्सवानंतर अशा घटनांची संख्या वाढताना दिसते. अनेकदा या मूर्ती कचऱ्यासोबत मिसळलेल्या अवस्थेतही आढळतात. वास्तविक, मूर्तींचे विसर्जन किंवा त्यांची विल्हेवाट लावण्याची एक विशिष्ट पद्धत असते. ती न पाळता अशाप्रकारे मूर्ती फेकणे हे केवळ धार्मिकदृष्ट्या चुकीचे नसून सामाजिक जबाबदारीकडे दुर्लक्ष करणारे कृत्य आहे. पालिका प्रशासनाने या प्रकाराची दखल घेऊन नागरिकांना योग्य पद्धतीने मूर्ती विसर्जित करण्यासंदर्भात आवाहन करावे किंवा अशा प्रकारच्या मूर्ती विल्हेवाटीची योग्य व्यवस्था अर्थात शहरातील काही ठिकाणी विशेष संकलन केंद्रे उभारण्याची योजना आखली जावी. जेणे करून अशा प्रकारांना आळा बसू शकेल, असे मत नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे.

दरम्यान, देवतांच्या मूर्तींशी निगडित असलेली श्रद्धा जपताना सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीही नागरिकांनी घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे नागरिकांनी जागरूक राहून अशा प्रकारांना विरोध करणे आणि योग्य पद्धतींचे पालन करायला हवे. ▲

## संपादकीय

# शिक्षण–स्वावलंबनाशिवाय समानतेचा पाया अपूर्ण

लोकसभेच्या जागांच्या पुनर्रचनेच्या संदर्भात केंद्र सरकारने घेतलेली भूमिका ही सध्या सुरू असलेल्या राजकीय चर्चेला दिशा देणारी ठरली आहे. विरोधी पक्षांसह दक्षिण भारतीय राज्यांनी व्यक्त केलेल्या शंकांना उत्तर देताना प्रत्येक राज्या च्या जागांमध्ये सुमारे ५० टक्के प्रमाणबद्ध वाढ करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यामुळे लोकसभेची एकूण सदस्यसंख्या वाढली तरी राज्यांचा परस्परांतील वाटा अबाधित राहील, ही बाब महत्त्वाची आहे. लोकसंख्या नियंत्रणात यशस्वी ठरलेल्या राज्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी स्वतंत्र तरतूद केली जाणार असल्याने संघराज्यीय संतुलन राखण्याचा प्रयत्न दिसतो. या पार्श्वभूमीवर विधिमंडळांमध्ये महिलांना एक तृती यांश प्रतिनिधित्व देण्याच्या दिशेने उचललेले पाऊल निश्चितच ऐतिहासिक म्हणावे लागेल. स्त्री–पुरुष समानतेच्या दिशेने भारताने अनेक टप्पे गाठले असले तरी अजूनही सामाजिक वास्तव पूर्णपणे बदललेले नाही. महिलांना राजकीय प्रतिनिधित्व देणे ही अत्यंत महत्त्वाची बाब असली, तरी केवळ आरक्षणाने स्त्री सशक्तीकरणाचा उद्देश पूर्ण होत नाही, हेही तित केच खरे आहे. प्रतिनिधित्व हा समानतेचा एक भाग आहे; पण सन्मान, स्वातंत्र्य आणि निर्णय क्षमता यासाठी स्त्रीला शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबनाची जोड मिळणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, विधिमंडळातील उपस्थिती केवळ प्रतीकात्मक ठरू शकते. भारतातील सामाजिक रचनेत स्त्रीची भूमिका परंपरेने घरगुती जबाबदाऱ्यांपुरती मर्यादित ठेवली गेली. आज परिस्थिती बदलत असली, तरी अनेक ठिकाणी महिलांना शिक्षण, रोजगार आणि स्वनिर्णयाचे स्वातंत्र्य अजूनही पूर्णपणे मिळालेले नाही. अशा स्थितीत केवळ आरक्षणाच्या माध्यमातून मिळालेले प्रतिनिधित्व पुरेसे ठरणार नाही. स्त्री शिक्षित असेल, तिच्याकडे आर्थिक स्त्रोत असतील आणि ती आत्मनिर्भर असेल, तरच ती आपला आवाज ठामपणे मांडू शकते. अन्यथा निर्णय प्रक्रियेत तिचा सहभाग मर्यादित राहण्याची शक्यता असते. महिला शिक्षण हा सशक्तीकरणाचा पाया आहे.

शिक्षणामुळे स्त्रीच्या विचारविश्वाचा विस्तार होतो, ती आपल्या हक्कांविषयी जागरूक होते आणि समाजातील अन्यायकारक प्रथांविरुद्ध आवाज उठवण्याचे धैर्य मिळवते. याचबरोबर आर्थिक स्वावलंबनामुळे तिच्या व्यक्तिमत्त्वात आत्मविश्वास निर्माण होतो. उत्पन्नाचे साधन असलेली स्त्री केवळ स्वत:साठीच नव्हे, तर आपल्या कुटुंबासाठी आणि समाजासाठीही अधिक प्रभावीपणे योगदान देऊ शकते. त्यामुळे शिक्षण आणि स्वावलंबन या दोन गोष्टी स्त्रीच्या सन्मानासाठी मूलभूत ठरतात. जागतिक पातळीवरील उदाहरणे पाहिली, तर केवळ आरक्षण असणे पुरेसे नसल्याचे दिसून येते. पाकिस्तानमध्ये महिलांसाठी आरक्षणाची तरतूद असूनही तिथे स्त्रियांच्या सन्मानाची स्थिती समाधानकारक नाही. याउलट अनेक पाश्चात्य देशांमध्ये महिलांसाठी आरक्षण नसतानाही त्यांच्या प्रतिनिधित्वाचे प्रमाण मोठे आहे. याचे मुख्य कारण म्हणजे त्या समाजांमध्ये महिलांना शिक्षण, रोजगाराच्या संधी आणि सामाजिक स्वातंत्र्य मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. म्हणजेच समानतेचा पाया केवळ कायद्यांवर नव्हे, तर सामाजिक व आर्थिक संरचनेवरही अवलंबून असतो. भारतातील परिस्थितीतही हेच तत्त्व लागू होते. महिलांना विधिमंडळात स्थान मिळणे महत्त्वाचे असले, तरी त्यांना निर्णयक्षम बनवणे अधिक महत्त्वाचे आहे. अनेकदा आरक्षणातून निवडून आलेल्या महिलांच्या मागे पुरुषांचे अप्रत्यक्ष नियंत्रण असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत वास्तविक सशक्तीकरण घडत नाही. स्त्री स्वत:च्या बळावर निर्णय घेण्यास सक्षम असेल, तरच ती खऱ्या अर्थाने समाजातील बदलाची वाहक बनू शकते. याच संदर्भात समाजातील मानसिकतेत बदल होणेही तितकेच आवश्यक आहे. स्त्रीकडे 'भोग्य' किंवा 'अबला' म्हणून पाहण्याची वृत्ती अजूनही काही प्रमाणात अस्तित्वात आहे. या दृष्टिकोनात बदल न झाल्यास कोणतेही कायदे किंवा आरक्षण प्रभावी ठरणार नाहीत.

स्त्रीला समानतेचा दर्जा देण्यासाठी तिच्याकडे व्यक्ती म्हणून, नागरिक म्हणून आणि सक्षम घटक म्हणून पाहणे गरजेचे आहे. घर, शिक्षण संस्था, कार्यक्षेत्र आणि समाज या सर्व स्तरांवर स्त्री–पुरुष समानतेची जाणीव रुजवणे आवश्यक आहे. भ्रष्टाचाराविरोधाती ल कायद्यांचा संदर्भ घेतला, तर केवळ कायदे अस्तित्वात असूनही समस्या पूर्णपणे सुटत नाही, हे स्पष्ट होते. आयपीसीच्या कलम १६१ ते १६५ मध्ये भ्रष्टाचाराविरोधातील तरतुदी दीर्घकाळ अस्तित्वात होत्या; तरीही भ्रष्टाचार आटोक्यात आला नाही. यावरून हे स्पष्ट होते, की केवळ कायदे किंवा आरक्षण पुरेसे नसतात. त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि समाजाची मानसिक तयारी आवश्यक असते. स्त्री सशक्तीकरणाच्या बाबतीतही हेच तत्त्व लागू होते. आजच्या काळात महिलांनी शिक्षण, विज्ञान, क्रीडा, राजकारण आणि उद्योग या सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय यश मिळविले आहे. मात्र, हे यश सर्वसामान्य स्त्रीपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. भारतामध्ये शिक्षणाचा प्रचार प्रसार याचा वेग पाश्चिमात्य देशांपेक्षा खूप कमी वेगाने झाला आहे. आपल्याकडे अधिपासूनच महिला शिक्षणाकडे कमी लक्ष दिले गेले आहे. महिला सक्षमीकरण ही काळाची गरज असताना देखील त्याकडे जाणिवपूर्वक दूर्लक्ष केले गेले आहे. ग्रामीण भागातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील महिलांसाठी शिक्षण व रोजगाराच्या संधी निर्माण करणे ही शासनाची आणि समाजाची संयुक्त जबाबदारी आहे. या पावलाला खऱ्या अर्थाने यशस्वी बनविण्यासाठी शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबन या दोन आधारस्तंभांची जोड देणे अपरिहार्य आहे. स्त्री शिक्षित, आत्मनिर्भर आणि आत्मविश्वासी असेल, तरच ती आपल्या हक्कांसाठी लढू शकते आणि समाजाच्या प्रगतीत सक्रिय योगदान देऊ शकते. शेवटी असे म्हणता येईल, की समानतेचा मार्ग केवळ कायदे किंवा आरक्षणातून जात नाही; तो शिक्षण, स्वावलंबन आणि सामाजिक जाणीव या त्रिसूत्रीवर उभा असतो. स्त्रीला खऱ्या अर्थाने सन्मान आणि समानतेचा दर्जा मिळवून द्यायचा असेल, तर या त्रिसूत्रीची अंमलबजावणी प्रामाणि कपणे करणे ही काळाची गरज आहे. तेव्हाच भारतातील लोकशाही अधिक समतोल, सक्षम आणि समावेशक बनेल.

# दया नायक यांच्या मुलाचा शाही विवाह सोहळा

## उद्धव ठाकरेंसह बॉलिवूडच्या दिग्गजांची मांदियाळी!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

३१ जुलै २०२५ रोजी सेवानिवृत्त झालेले नायक हे मुंबई पोलीस दलातील चकमकफेम अधिकाऱ्यांच्या पिढीतील शेवटचे सक्रिय अधिकारी होते. त्यांच्या मुलाच्या या विशेष सोहळ्याला राजकीय आणि मनोरंजन विश्वातील अनेक बड्या चेहऱ्यांनी हजेरी लावली होती. शिवसेना पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दया नायक यांच्या मुलाच्या लग्नाला उपस्थित राहून नवदाम्पत्याला शुभेच्छा दिल्या.

दिग्गज मराठी अभिनेते नाना पाटेकर यांनी दया नायक यांच्या मुलाच्या लग्नसोहळ्याला विशेष उपस्थिती दर्शवली. बॉलिवूडचा 'बजरंगी भाईजान' अभिनेता सलमान खान याने दया नायक यांच्या मुलाच्या लग्नाला उपस्थित राहून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अभिनेता टायगर श्रॉफने दया नायक यांच्या मुलाच्या लग्नाला हजेरी लावत सोहळ्याची शोभा वाढवली. बॉलिवूडचा 'खिलाडी' अक्षय कुमार याने दया नायक यांच्या मुलाच्या विवाह सोहळ्याला उपस्थित राहून वधु–वरांना आशीर्वाद दिले. प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेते मनोज बाजपेयी यांनी या दिमाखदार सोहळ्याला हजेरी लावली होती. केंद्रीय महसूल अधिकारी समीर वानखेडे यांनी दया नायक यांच्या मुलाच्या विवाह सोहळ्याला हजेरी लावली. बॉलिवूड अभिनेते रजत बेदी यांनी दया नायक यांच्या पुत्राच्या विवाह सोहळ्याला हजेरी लावली होती.

बॉलिवूडचा चॉकलेट बॉय वरुण धवन यानेही या लग्नसोहळ्याला उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. बॉलिवूड अभिनेता विकी कौशल दया नायक यांच्या मुलाच्या लग्नामध्ये उत्साहाने सहभागी झाला होता. ▲

# ठेका पद्धतीला व्यापाऱ्यांचा विरोध

## पारंपरिक पद्धत कायम न राहिल्यास मोर्चा व धरणे आंदोलनाचा इशारा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील नगरपरिषदेमार्फत दरवर्षी भरविण्यात येणाऱ्या पारंपरिक यात्रेत यंदा ठेका पद्धती लागू करण्याच्या निर्णयावरून वाद निर्माण झाला असून, स्थानिक दुकानदार, पाळणेधारक व नागरिकांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. यासंदर्भात मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत हा निर्णय तात्काळ रद्द करण्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे.दरवर्षीप्रमाणे नगरपरिषदेमार्फत थेट पावती देऊन शुल्क वसुलीची पारदर्शक पद्धत राबवली जात होती. ही पद्धत स्थानिक व्यावसायिकांच्या हिताची असल्याचे आंदोलकांनी नमूद केले. मात्र यंदा ठेका पद्धतीने वसुली करण्याचा निर्णय घेतल्याने दुकानदारांवर अवाजवी आर्थिक भार पडण्याची शक्यता असून, यामुळे शोषण व भ्रष्टाचाराला वाव मिळू शकतो, अशी तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली आहे.तसेच, मीना बाजार विखुरल्यास विशेषतः महिलांच्या



*अमळनेर : मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना व्यापाऱ्यांच्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी देवा लांडगे, विजय राजपूत, दिलीप ठाकूर, सुभाष पाटील, राहुल चौधरी आदी.*

सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतात, असेही निवेदनात नमूद करण्यात आले. गेल्या अनेक वर्षांपासून ज्या पारंपरिक जागांवर व्यवसाय केला जातो, त्या जागांवरच व्यवसाय करण्यास परवानगी देण्याची मागणी आंदोलकांनी केली आहे.नगरपरिषदेसमोर मांडण्यात आलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये ठेका पद्धती तात्काळ रद्द करून जुनी पद्धत कायम ठेवणे, मीना बाजार एकाच ठिकाणी ठेवणे तसेच पारंपरिक पाळणेधारकांना त्यांच्या मूळ जागांवर व्यवसायाची संधी देणे यांचा समावेश आहे.या मागण्यांकडे प्रशासनाने तत्काळ लक्ष न दिल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन, धरणे आणि मोर्चा काढण्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे. तसेच उद्भवणाऱ्या कोणत्याही कायदा व सुव्यवस्था परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही यावेळी देण्यात आला.यावेळी देवा लांडगे (भाजप शहर सरचिटणीस), माजी अध्यक्ष विजय राजपूत, दिलीप ठाकूर, सुभाष पाटील, राहुल चौधरी, रमेश देव, रामभैया कलोसे, महेश संदांशिव, रवी ठाकूर, विजय विठ्ठल पाटील, मनोहर महाजन यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. ▲



# आंबा नैसर्गिकरित्या पिकलेला आहे की रसायनाने?

## FSSAI ने सांगितले तो कसा ओळखावा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उन्हाळ्याचा हंगाम सुरू झाला की बाजारात आंबा, केळी आणि पपई यांसारख्या फळांची मोठी आवक होते. मात्र, वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी अनेकदा ही फळे कृत्रिमरित्या आणि धोकादायक रसायनांचा वापर करून पिकवली जातात. या गंभीर बाबीची दखल घेत भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना कडक इशारा दिला आहे.

फळे पिकवण्यासाठी प्रतिबंधित रसायनांचा वापर करणाऱ्यांवर आता थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. FSSAI ने आरोग्यासाठी धोकादायक असेलेले, परंतू फळे पिकवण्यासाठी वापरले जाणारे कॅल्शियम कार्बाइडच्या वापरावर पूर्णपणे बंदी घातली आहे. प्राधिकरणाने जारी केलेल्या नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार, इथिलीन गॅसचा वापर करून फळे पिकवणे सुरक्षित मानले जाते. स्ट्रिप पेपर टेस्ट गोदामांमध्ये किंवा फळबाजारांमध्ये कॅल्शियम कार्बाइडचा वापर झाला आहे की नाही, हे तपासण्यासाठी 'स्ट्रिप पेपर टेस्ट' करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

कशी होते चाचणी?

एका बंद डब्यात फळे ठेवून त्यात ओल्या निदर्शक कागदाची पट्टी ठेवली जाते. जर या पट्टीचा रंग वेगाने बदलला, तर त्या फळांवर रसायनाचा वापर झाला असल्याचे सिद्ध होते. जर एखाद्या व्यापाऱ्याकडे कॅल्शियम कार्बाइड किंवा प्रतिबंधित रसायने आढळली, तर त्याच्यावर दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

रंगावरून ओळखा

नैसर्गिकरीत्या पिकलेला आंबा पूर्णपणे पिवळा नसून त्यावर कुठे हिरवे ठिपके असू शकतात. रासायनिक आंबा पूर्णपणे एकसारखा पिवळाधमक दिसतो. नैसर्गिक आंब्याला एक विशिष्ट गोड सुगंध असतो. केमिकलने पिकवलेल्या आंब्याला वास नसतो किंवा उग्र रासायनिक वास येतो. नैसर्गिक आंब्याचा गर लालसर पिवळा असतो, तर रासायनिक आंब्याचा गर आतून पांढरट किंवा फिका पिवळा असतो. ▲

# अक्षय्य तृतीयेनंतर सोने, चांदी स्वस्त

**पान १ वरुन...**

या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदार सुरक्षित पर्याय म्हणून सोन्याकडे वळत आहेत, ज्यामुळे किमतींमध्ये सतत चढ–उतार होत आहेत. चांदीच्या दरांमध्येही याच कारणांमुळे अस्थिरता दिसून येत आहे. एकूणच, वाढत्या किमतींसह जागतिक तणाव आणि बदलती ग्राहकवृत्ती यामुळे सोन्याच्या बाजारात नवे ट्रेंड स्पष्टपणे दिसून आले असून, पुढील काळातही याचा परिणाम कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जळगाव शहरातील सुवर्ण बाजारपेठेत शनिवारी ११३३ रुपयांची वाढ झाल्याने २४ कॅरेट सोन्याचे दर जीएसटीसह प्रति १० ग्रॅम १,५८,००२ रुपयांपर्यंत होते. तर रविवारी अक्षय्य तृतीयेच्या दिवशी ३०९ रुपयांची किरकोळ झाल्याने सोन्याचे दर जीएसटीसह प्रति १० ग्रॅम १,५७,६९३ रुपयांपर्यंत खाली आले होते. सोमवारी सकाळी आणखी ८२४ रुपयांची घट नोंदवली गेली. त्यामुळे सोन्याचे दर जीएसटीसह प्रति १० ग्रॅम १,५६,८६९ रुपयांपर्यंत घसरले.जळगाव शहरातील सुवर्ण बाजारपेठेत शनिवारी ८२४० रुपयांची वाढ झाल्याने चांदीचे दर जीएसटीसह प्रति किलो २,६९,८६० रुपयांपर्यंत होते. तर अक्षय्य तृतीयेच्या दिवशी रविवारी २०६० रुपयांची घट झाल्याने चांदीचे दर २,६७,८०० रुपयांपर्यंत खाली आले होते. सोमवारी सकाळी बाजारपेठ उघडल्यावर आणखी ४१२० रुपयांची घट नोंदवली गेली. त्यामुळे चांदीचे दर जीएसटीसह प्रति किलो २,६३,६८० रुपयांपर्यंत घसरले.

# सहा सामने होऊनही धोनी अजूनही मैदानात नाही?

## 'सीएसके'च्या प्रशिक्षकाने अखेर सत्य सांगितले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चेन्नई सुपर किंग्स संघाने इंडियन प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेतील आत्तापर्यंत ६ सामने खेळले आहेत. या ६ सामन्यांपैकी केवळ २ सामने चेन्नईने जिंकले आहेत. असे असतानाच चेन्नईचा सर्वात अनुभवी खेळाडू एमएस धोनीच्या गैरहजेरीची सध्या जोरदार चर्चा आहे.

धोनीला आयपीएल २०२६ स्पर्धा सुरू होण्यापूर्वीच पोटरीची दुखापत झाली होती. त्यामुळे तो साधारण दोन आठवडे स्पर्धेतून बाहेर असेल, याची माहितीही चेन्नईने दिली होती. पण आता तीन आठवडे झाले आहे, मात्र अद्याप धोनी खेळलेला नाही.

इतकेच नाही, तर तो या ६ सामन्यांमध्ये एकदाही स्टेडियमवरही दिसलेला नाही. धोनी सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यासाठी चेन्नईच्या संघासह हैदराबादला पोहचला होता. तसेच तो नेट्समध्येही सराव करत असल्याचे दिसले होते. त्यामुळे तो या सामन्यात शनिवारी (१८ एप्रिल) खेळेल, असे अनेकांना वाटले होते. मात्र १० धावांनी चेन्नईचा पराभव झालेल्या या सामन्यातही धोनी खेळला नाही. त्यामुळे धोनी कधी खेळणार असे प्रश्न उपस्थित होत आहे. आता याबाबत चेन्नई सुपर किंग्सचा फलंदाजी प्रशिक्षक माईक हसीने याबाबत उत्तर दिले आहे. त्याने म्हटले आहे की तो



त्याची तंदुरुस्ती मिळवत असून तो लवकरच पुनरागमन करेल, अशी आशा आहे.

हैदराबादविरुद्धच्या सामन्यानंतर हसीने सांगितले, 'तो दुखापतीतून चांगल्याप्रकारे सावरत आहे. हे पाहा, मी फलंदाजी प्रशिक्षक आहे, आणि आत्ता तो जशी फलंदाजी करतोय, ते पाहून मी खूश आहे.' हसीने पुढे सांगितले की सध्या तो त्याचे 'रनिंग फिटनेस' मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. कारण धावा घेण्यासाठी पळावे लागणार आहे. पण हसीने धोनी कधी पुनरागमन करणार, याबाबत स्पष्ट तारीख सांगितली नाही.

हसी म्हणाला, 'तुम्ही काल त्याची ट्रेनिंग पाहिली असेल, तर तो चांगली फलंदाजी करतोय. तो जशी फलंदाजी करतोय, त्यासाठी तो खूश आहे. पण तो सध्या त्याच्या धावण्यावरही लक्ष देत आहे. कारण तो डावाच्या शेवटी फलंदाजी करणार आहे. त्यामुळे त्याला एकेरी–दुहेरी धावा घाईत घ्याव्या लागतील, त्यामुळे त्याचा त्याच्या धावण्यावर विश्वास यायला हवा आणि तेवढा वेग असायला हवा. मला माहित नाही, तो कधी खेळणार आहे. पण ज्याप्रकारे चाहत्यांना आशा आगे, तशीच मलाही आहे की त्याने लवकर पुनरागमन करावे.'

यापूर्वी गेल्या १८ हंगामात धोनी आयपीएलच्या सुरूवातीला खेळला नाही, असे कधी झाले नव्हते. विशेष म्हणजे एकाच हंगामात ६ सामन्यांना मुकण्याचीही ही त्याची पहिलीच वेळ आहे. धोनी गेल्या १८ हंगामात सलग आयपीएलमध्ये खेळलेला दिसला आहे. त्याने आयपीएलमध्ये २७८ सामने खेळले असून ५,४३९ धावा केल्या आहेत. त्याने यष्टीरक्षक म्हणून २०१ बळीही घेतले आहेत.

दरम्यान, धोनी संघात परत आल्यास तो प्लेइंग इलेव्हनमध्ये कोणाच्या जागेवर खेळणार हे पाहावे लागणार आहे. सध्या धोनीच्या अनुपस्थितीत संजू सॅमसन यष्टीरक्षणाची जबाबदारी सांभाळत आहे. त्यामुळे धोनीच्या पुनरागमनानंतरही कोण यष्टीरक्षण करताना दिसणार, हे देखील पाहावे लागणार आहे. ▲

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# गणिताच्या विस्मयकारक तारा : शकुंतला देवी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**स्मृतिदिन विशेष**

जगातील 'ह्युमन कॉम्प्युटर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शकुंतला देवी या केवळ एक गणितज्ञ नव्हत्या, तर त्या मानवी बुद्धिमत्तेची सर्वोच्च सीमा गाठणाऱ्या एक अद्वितीय व्यक्ती होत्या.

२१ एप्रिल २०१३ रोजी त्यांनी या जगाचा निरोप घेतला, परंतु त्यांनी गणिताच्या क्षेत्रात जी किमया साधली, ती



आजही विज्ञानाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिलेली आहे. शकुंतला देवी यांचा जन्म ४ नोव्हेंबर १९२९ रोजी कर्नाटकातील बंगळुरू येथे झाला. त्यांना कोणतेही औपचारिक गणिती प्रशिक्षण मिळाले नव्हते, तरीही त्यांची आकडेमोड करण्याची क्षमता इतकी वेगवान होती की, त्या काळातील सुरुवातीचे संगणकही त्यांच्यासमोर थिटे पडत असत.

१९८० मध्ये लंडनच्या इम्पेरियल कॉलेजमध्ये त्यांनी १३ अंकी दोन मोठ्या संख्यांचा गुणाकार अवघ्या २८ सेकंदात अचूकपणे करून दाखवला, ज्याची नोंद 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्ये करण्यात आली. ही केवळ आकडेमोड नव्हती, तर मानवी मेंदूच्या अफाट शक्तीचे ते एक जिवंत प्रदर्शन होते. शकुंतला देवींचे कार्य केवळ गणितापुरते मर्यादित नव्हते. त्या एक उत्तम ज्योतिर्विद होत्या, ज्यांनी ज्योतिषशास्त्रावरही पुस्तके लिहिली होती. त्यांना मानवी वर्तनाचाही विशेष अभ्यास होता. शकुंतला देवींनी १९७७ मध्ये 'द वर्ल्ड ऑफ होमोसेक्स्युअल्स' हे पुस्तक लिहून भारतातील समलैंगिकतेसारख्या संवेदनशील विषयावर अत्यंत प्रगल्भ भाष्य केले होते.

अशा प्रकारचे धाडसी विचार मांडणे त्या काळी अत्यंत कठीण होते, मात्र त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर हे करून दाखवले.त्यांनी लिहिलेली 'मॅजिक ऑफ नंबर्स' सारखी पुस्तके आजही विद्यार्थ्यांना गणिताची भीती घालवण्यासाठी आणि त्या विषयाची गोडी निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरतात. त्यांच्या संघर्षाचा आणि यशाचा प्रवास आज अनेक स्त्रियांसाठी प्रेरणादायी आहे. २०२० मध्ये त्यांच्या जीवनावर आधारित 'शकुंतला देवी' हा चित्रपट प्रदर्शित झाला, ज्यातून नवीन पिढीला त्यांच्या या थक्क करणाऱ्या प्रवासाची ओळख झाली. शकुंतला देवी यांचे आयुष्य म्हणजे एक धडा आहे की, जर जिद्द असेल तर माणूस यंत्रालाही हरवू शकतो. गणिताच्या क्लिष्ट आकडेमोडीला त्यांनी खेळाप्रमाणे सोपे केले. त्यांचे निधन झाले असले तरी, 'मानवी संगणक' म्हणून त्यांचे नाव आणि त्यांचे गणिती योगदान या जगाच्या स्मरणात सदैव जिवंत राहील. साध्या राहणीमानातील ही अलौकिक प्रतिभा आजही विज्ञानाच्या अभ्यासकांसाठी एक दीपस्तंभ आहे.

# अभिनयाचा संयमी प्रवास : शिवाजी साटम


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**जन्मदिन विशेष**

भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी सृष्टीतील एक अत्यंत आदरणीय आणि संयमी अभिनेता म्हणून शिवाजी साटम यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. २१ एप्रिल १९५० रोजी मुंबईतील एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेले साटम, आज केवळ एका लोकप्रिय मालिकेतील भूमिकेमुळेच नव्हे, तर त्यांच्या प्रदीर्घ अभिनय कारकिर्दीमुळे लाखो रसिकांच्या हृदयावर राज्य करत आहेत. शिवाजी साटम यांचा अभिनय क्षेत्रापर्यंतचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. अभिनयात येण्यापूर्वी ते 'सेंट्रल बँक ऑफ इंडिया'मध्ये कॅशियर म्हणून कार्यरत होते.

सुरुवातीच्या काळात त्यांनी मराठी रंगभूमीवरून अभिनयाची सुरुवात केली. नाटकांच्या व्यासपीठावर त्यांनी आपल्या आवाजाचा आणि अभिनयाचा एक वेगळा ठसा उमटवला.त्यांच्या कारकिर्दीतील सुवर्णकाळ सुरू झाला तो त्यांच्या हिंदी आणि मराठी चित्रपटांमधील प्रवेशाने. 'वास्तव', 'गुलाम-ए-मुस्तफा', 'नायक' आणि 'चायना गेट' सारख्या चित्रपटांमधून त्यांनी विविध छटांच्या भूमिका साकारल्या. एका कडक पोलीस अधिकाऱ्यापासून ते संवेदनशील वडिलांच्या भूमिकेपर्यंत त्यांनी घेतलेला आवाका थक्क करणारा आहे. मराठी चित्रपटसृष्टीत 'उत्तरायण', 'दे धक्का', 'हापूस' आणि 'निशानी डावा अंगठा' अशा चित्रपटांमधून त्यांनी मराठी प्रेक्षकांच्या मनात कायमचे स्थान निर्माण केले.

मात्र, शिवाजी साटम यांची खरी ओळख घराघरात पोहोचली ती 'सी.आय.डी.' या लोकप्रिय दूरचित्रवाणी मालिकेतील 'एसीपी प्रद्युम्न' या भूमिकेमुळे. एक प्रामाणिक, कर्तव्यदक्ष आणि अचूक निर्णय घेणारा पोलीस अधिकारी, अशी त्यांची प्रतिमा इतकी दृढ झाली की, आजही त्यांना पाहताक्षणी प्रेक्षकांच्या मनात 'सी.आय.डी.' ची आठवण जागी होते. या भूमिकेतील त्यांचा 'दये, कुछ तो गडबड है' हा संवाद तर जणू एका पिढीचा 'सिग्नेचर' संवाद बनला आहे.शिवाजी साटम यांच्या अभिनयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा 'संयम'. ते कधीही अभिनयाचा अतिरेक करत नाहीत. त्यांच्या डोळ्यांतून आणि आवाजाच्या लयीतून ते भूमिकेतील गांभीर्य प्रेक्षकांपर्यंत पोहोचवतात. भौतिकशास्त्राचे शिक्षण घेतलेले साटम साध्या राहणीमानाचे आहेत, पण कलेच्या बाबतीत ते कमालीचे चोखंदळ आहेत.एक उत्तम अभिनेता म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीत केवळ प्रसिद्धीच मिळवली नाही, तर आपल्या चारित्र्याने आणि कामाप्रती असलेल्या निष्ठेने अनेक तरुण कलाकारांसाठी एक आदर्श निर्माण केला आहे. वयाची ७५ वर्षे पूर्ण करत असतानाही, त्यांच्यातील अभिनयाची ऊर्जा अजूनही तशीच टिकून आहे. शिवाजी साटम हे केवळ एक अभिनेता नसून, मराठी माणसाच्या प्रतिभेचा एक समृद्ध वारसा आहेत, ज्यांनी आपल्या कलेने मनोरंजन विश्वाला अधिक अर्थपूर्ण बनवले आहे. त्यांचे योगदान येणाऱ्या अनेक पिढ्यांना अभिनय क्षेत्रातील गांभीर्य आणि निष्ठेची आठवण करून देत राहील.



# रात्री झोप का लागत नाही?

## फॉलो करा तज्ज्ञांनी सांगितलेला हा '३-३-३' नियम, येईल गाढ झोप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

निरोगी आयुष्यासाठी उत्तम झोप घेणे अतिशय आवश्यक मानले जाते. पण आजच्या धावपळीच्या युगात बिघडलेल्या जीवनशैलीमुळे लोकांच्या झोपण्याच्या वेळा बदलल्या आहेत. याचा थेट परिणाम झोपेच्या गुणवत्तेवर होत असून अनेकांना शांत झोप लागत नाही, तर काहींना रात्रीची भीती वाटते किंवा वाईट स्वप्ने पडतात. अशा परिस्थितीत गाढ झोप मिळविण्यासाठी काय करावे, याबाबतची सविस्तर माहिती जाणून घेणे अतिशय गरजेचे आहे.



**झोपण्यापूर्वी महाप्राण ध्वनीचे उच्चारण करणे फायदेशीर?**

जर रात्री शांत झोप हवी असेल तर झोपण्यापूर्वी 'डीप ब्रीदिंग' (दीर्घ श्वसन) सुरू करा. त्यानंतर अंथरुणावर बसून नऊ वेळा 'महाप्राण ध्वनी'चा उच्चार करावा. हा उच्चार करण्यासाठी तोंड बंद ठेवून आधी दीर्घ श्वास घ्यावा आणि मग गुंजन करावे. यामुळे केवळ चांगली झोपच लागत नाही, तर रात्री वाईट स्वप्ने पडणे किंवा भीती वाटणे देखील बंद होते.

**झोप पूर्ण होण्याचे फायदे**

चांगली तसेच झोप पूर्ण होणे यामुळे मेंदू तसेच शारीरिक आरोग्यावर चांगले परिणाम होतात. यामुळे स्मरणशक्ती देखील चांगली राहते, विचार सकारात्मक होऊ लागतात, हृदयाशी संबंधित समस्यांचा धोका कमी होतो. नियमित सात ते आठ तास झोपल्यास शारीरिक तसेच मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत मिळते.

**गाढ झोपेसाठी '३-३-३' नियम काय आहे?**

रात्री गाढ झोप लागण्यासाठी '३-३-३' नियम अतिशय प्रभावी ठरतो. झोपण्यापूर्वी ३ तास आधी जड व्यायाम करणे टाळावे.

झोपण्यापूर्वी किमान ३ तास आधी रात्रीचे जेवण करावे. दुपारी ३ वाजेनंतर कॅफिनयुक्त पेय-पदार्थांचे (चहा, कॉफी) सेवन करू नये.

**गाढ झोप येण्यासाठी काही खास टिप्स**

**गॅजेट्सपासून दूर राहा :** झोपताना फोन, टॅबलेट किंवा कम्प्युटर वापरू नका. या उपकरणांमधून निघणारा प्रकाश मेलाटोनिन हार्मोन तयार होण्यास अडथळा आणतो, जो झोप येण्यासाठी आवश्यक असतो.

**अंथरुणाचा वापर :** अंथरुणाचा वापर फक्त झोपण्यासाठीच करा. यामुळे बेडवर जाताच मेंदूला झोपेचे संकेत मिळतात.

**२० मिनिटांचा नियम :** जर अंथरुणावर पडल्यानंतर २० मिनिटांत झोप आली नाही, तर खोलीबाहेर पडा आणि काहीतरी शांत काम करा (उदा. वाचन), जोपर्यंत पुन्हा झोप येत नाही.


**नियमित व्यायाम आणि सूर्यप्रकाश :** दिवसा नियमित व्यायाम करा आणि थोडा वेळ सूर्यप्रकाशात घालवा. यामुळे रात्री लवकर झोप येण्यास मदत होते.

# प्रशासकीय बांधिलकीचा गौरव

# भारतीय नागरी सेवा दिन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी २१ एप्रिल हा दिवस भारतात 'नागरी सेवा दिन' म्हणून साजरा केला जातो. देशाच्या प्रशासकीय यंत्रणेचा कणा असलेल्या आणि धोरणांच्या अंमलबजावणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सनदी अधिकाऱ्यांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी हा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे. २१ एप्रिल १९४७ रोजी भारताचे पहिले उपपंतप्रधान आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी दिल्लीतील मेटकाफ हाऊस येथे 'प्रशासकीय सेवा प्रोबेशनर्स'ना संबोधित केले होते. त्यांनी या नागरी सेवकांना 'भारताचे स्टील फ्रेम' असे संबोधले होते. देशाच्या एकतेसाठी आणि अखंडतेसाठी नागरी सेवांचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या याच ऐतिहासिक भाषणाच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. नागरी सेवा दिनाचे मुख्य उद्दिष्ट केवळ अधिकाऱ्यांचा सन्मान करणे हे नाही, तर त्यांना स्वतःच्या कार्याचे पुनरावलोकन करण्यास प्रवृत्त करणे हे देखील आहे. प्रशासन अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि लोकाभिमुख कसे करता येईल, यावर या दिवशी सविस्तर चर्चा केली जाते. तसेच, केंद्र आणि राज्य स्तरावर उत्कृष्ट प्रशासकीय कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि पथकांना 'लोक प्रशासनातील उत्कृष्टतेसाठी पंतप्रधान पुरस्कार' देऊन सन्मानित केले जाते.आजच्या डिजिटल युगात, नागरी सेवांचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. 'ई-गव्हर्नन्स' , पारदर्शकता आणि नागरिक-केंद्रित सेवांवर भर दिला जात आहे. 'मिनिमम गव्हर्नमेंट, मॅक्सिमम गव्हर्नन्स' या सूत्राचा अवलंब करून प्रशासन सामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न नागरी सेवा करत आहेत.एक सनदी अधिकारी हा केवळ सरकारी नियमांची अंमलबजावणी करणारा नसून, तो समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणारा दुवा असतो. संकटकाळात, नैसर्गिक आपत्तींच्या वेळी किंवा सामाजिक कल्याणाच्या योजना राबवताना, प्रशासकीय यंत्रणाच देशाचा आधारस्तंभ म्हणून काम करते. २१ एप्रिल हा दिवस केवळ सनदी अधिकाऱ्यांसाठी नाही, तर संपूर्ण भारतीय प्रशासनासाठी आत्मचिंतनाचा दिवस आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी, न्याय्य समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी आणि देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी 'नागरी सेवा' हे एक अत्यंत प्रभावी साधन आहे. आपल्या कर्तव्याप्रती निष्ठा आणि जनकल्याणाची भावना हीच या नागरी सेवांची खरी ओळख आहे.नागरी सेवा दिन प्रशासनाला अधिक जबाबदार आणि मानवी दृष्टिकोन ठेवून काम करण्यास प्रोत्साहन देतो, जेणेकरून सुशासनाच्या माध्यमातून राष्ट्राचे भविष्य सुरक्षित करता येईल.



# जागतिक क्रिएटिव्हिटी आणि इनोव्हेशन दिन : कल्पकतेचा उत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या वेगाने बदलणाऱ्या युगात, जिथे तंत्रज्ञान आणि आव्हाने दररोज नवीन रूपे धारण करत आहेत, तिथे 'सर्जनशीलता' आणि 'नवकल्पना' या केवळ शब्द नसून प्रगतीची गुरुकिल्ली ठरत आहेत. दरवर्षी २१ एप्रिल रोजी जगभरात 'जागतिक क्रिएटिव्हिटी आणि इनोव्हेशन दिन' साजरा केला जातो. हा दिवस मानवी बुद्धिमत्तेचा उत्सव आहे आणि त्यासोबतच जगातील समस्यांवर नवनवीन उपाय शोधण्यासाठी आपल्याला प्रेरणा देणारा एक महत्त्वाचा टप्पा आहे. सर्जनशीलता म्हणजे नवीन आणि कल्पक कल्पना सुचण्याची क्षमता, तर नवकल्पना म्हणजे त्या कल्पनेला कृतीत आणून त्यातून काहीतरी उपयुक्त निर्माण करणे. जेव्हा आपण एखाद्या समस्येकडे 'आउट ऑफ द बॉक्स' दृष्टीकोनातून पाहतो, तेव्हा तिथे सर्जनशीलतेचा जन्म होतो. आणि जेव्हा आपण त्या विचाराला प्रत्यक्षात अमलात आणून मानवी जीवन अधिक सुसह्य करतो, तेव्हा ती नवकल्पना ठरते.संयुक्त राष्ट्रांनी या दिवसाची घोषणा केली, कारण शाश्वत विकासासाठी नवनवीन प्रयोगांची अत्यंत आवश्यकता आहे.



हवामान बदल, गरिबी, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या जागतिक समस्या जुन्या पद्धतींनी सुटणे कठीण आहे. अशा वेळी, सर्जनशील विचारच आपल्याला मार्ग दाखवू शकतात. सौर ऊर्जेचा वापर असो किंवा प्लास्टिकच्या कचऱ्यावर काढलेला उपाय, हे सर्व नाविन्यपूर्ण विचारांचेच फळ आहे.सर्जनशीलता केवळ शास्त्रज्ञांची किंवा कलाकारांची मक्तेदारी नाही. आपल्यापैकी प्रत्येकजण आपल्या आयुष्यात रोज नवनवीन उपाय शोधत असतो.

घरातील एखादे काम वेगाने पूर्ण करण्यासाठी केलेली छोटीशी सुधारणा किंवा कामाच्या ठिकाणी प्रक्रियेत केलेला बदल, हे सर्व 'इनोव्हेशन'च आहे. हा दिवस आपल्याला हे आठवण करून देतो की, आपण सर्वांनी आपल्यातील कल्पकतेला वाव दिला पाहिजे.सर्जनशीलता ही एक अशी संपत्ती आहे जी जितकी जास्त वापरली जाते, तितकी ती अधिक समृद्ध होते. जागतिक क्रिएटिव्हिटी आणि इनोव्हेशन दिनानिमित्त आपण प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे: "मी माझ्या आजूबाजूच्या समस्यांवर नवीन पद्धतीने कसा विचार करू शकतो?" जर आपण सर्वांनी ही वृत्ती जोपासली, तर येणारा काळ हा केवळ प्रगतीचाच नाही, तर कल्पकतेच्या जोरावर अधिक सुंदर आणि समृद्ध जीवनाचा असेल.आजचा दिवस साजरा करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजेएखाद्या जुन्या समस्येवर नवीन उपाय शोधणे किंवा एखादी नवीन कला आत्मसात करणे. चला, आपल्या कल्पकतेने जगाला एक सकारात्मक दिशा देऊया!

# लड़कियों के कपड़े सिले-पढ़ाई भी की..

## लेडीज टेलर से बने एसडीएम महेंद्र भाटी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**सक्सेस स्टोरी**

जोधपुर के महेंद्र भाटी ने अपनी सफलता से यह साबित कर दिया है कि हालात चाहें जैसे भी हों अगर आपके अंदर जीत का जुनून जिंदा है और लक्ष्य को पाने का दृढ़ निश्चय है तो आपको कोई नहीं हरा सकता है। यही वजह है कि जिन्हें लोग अब तक लेडीज टेलर के नाम से जानते थे, उन्हें अब एसडीएम पद के नाम से जानेंगे।

महेंद्र भाटी की सक्सेस स्टोरी उन तमाम युवाओं को प्रेरित कर रही है जिनके कंधों पर जिम्मेदारियों का बोझ है, लेकिन आंखों में कुछ बनने के सपने हैं।दरअसल, राजस्थान लोक सेवा आयोग ने १८ अप्रैल २०२६ को राजस्थान प्रशासनिक सेवा परीक्षा २०२४ का फाइनल रिजल्ट जारी कर दिया है। आरएएसी रिजल्ट जारी होने के बाद क्वालीफाई हुए उम्मीदवारों के संघर्ष और कठिनाइयों की कहानी सामने आ रही हैं। उन्हीं में एक नाम महेंद्र भाटी का भी है। जिन्होंने न सिर्फ आरएएस एग्जाम में सफलता प्राप्त की है, बल्कि राज्य में ७२ वां स्थान



प्राप्त किया है। दूसरी बार आरएएस एग्जाम क्रैक करने वाले महेंद्र भाटी जोधपुर के बहुत साधारण परिवार से आते हैं।

एक इंटरव्यू में उन्होंने बताया कि उनका पूरा परिवार सिलाई का काम करता है। उनके पिता, मां, भाई और भाभी, सभी सिलाई का काम करते हैं। वह खुद भी इस काम से जुड़े रहे हैं। महेंद्र खुद भी लड़कियों के कपड़े सिलाई का काम करते आ रहे हैं।परिवार की जिम्मेदारियां भी बांटनी थीं और अपना करियर भी बनाना था। महेंद्र ने दोनों को चुना। सिलाई मशीन कभी-कभी स्टडी टेबल बन जाती थी। उन्होंने कपड़े भी सिले और पढ़ाई भी की। सुबह जल्दी उठकर या शाम को जब भी समय मिलता, वे प्रतियोगी परीक्षा की तैयारी में लग जाते थे। इस तरह उन्होंने अपनी जिम्मेदारियों को संभालते हुए कामयाबी हासिल की है।यह पहली बार नहीं है जब महेंद्र भाटी ने राजस्थान की सबसे प्रतिष्ठित परीक्षा पास की है।

राजस्थान प्रशासनिक सेवा परीक्षा २०२३ की मेरिट लिस्ट में भी उनका नाम था। पिछली बार उनकी १३२३वीं रैंक आई थी। उन्होंने रैंक सुधारने के लिए फिर से आरएएस की प्रिपरेशन के लिए किताबें उठाईं और सफल हुए। आरएएस मेन्स में उन्हें २४९ नंबर और इंटरव्यू में ५३ नंबर मिले हैं। ९०० में ३०२ नंबर लाकर उन्होंने २०२४ की आरएएस परीक्षा में ७२वीं रैंक हासिल की है।

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# श्री मंगळग्रहापासून कसा बनतो रुचक योग?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मंगळ ताकद आणि ॲग्रेशनचा प्रमुख कारक ग्रह आहे. मंगळ अग्नीतत्त्वाचा ग्रह आहे. अग्नीपासूनच हे जग चालले आहे. कल्पना करा, की जगातील सर्व फॅक्टरींमधून अग्नी बाजूला केला तर कुठले प्रॉडक्शन तयार होईल का? ते सोडाच अग्नीशिवाय आपण साधे जेवणही बनवू शकत नाही. आधी मानवाचा सर्वांत प्रथम शोधही अग्नीच होता आणि ते पचवण्यासाठी पण ऊर्जा लागतेच.

जाणून घेऊया श्री मंगळग्रहापासून होणारा रुचक महापुरुष योग

ऊर्जा, शक्ती, साहस, हिंमत, गती आणि कर्माचे ग्रह आहेत मंगळ. मंगळाच्या उत्तम स्थितीशिवाय कोणीही व्यक्ती डॉक्टर, इंजिनिअर, आर्मी ऑफिसर, मॅनेजर, खेळाडू होत नाही. हाच मंगळ जेव्हा कुंडलीत आपल्या स्वराशीत, उच्च राशीत कुंडलीमध्ये केंद्रस्थानी असेल तर रुचक नामक महापुरुष योग होतो.

मंगळ जेव्हा कुंडलीत सुस्थितीत असतो, रुचक योग बनवतो तेव्हा व्यक्तीला अतिशय पुढे घेऊन जातो. पण जेव्हा मंगळ दूषित होतो तेव्हा रक्तविषयक आजारपण, अपघातही देऊ शकतो. मंगळ प्रभावित जातकांचे डोळे लालसर आणि नजर भेदक पाहायला मिळते. चाल वाघाप्रमाणे, मजबूत मंगळ असलेला व्यक्ती नुसता समोरून जरी गेला तरी त्याचा प्रभाव चटकन लक्षात येतो. मंगळ इच्छाशक्तीचा कारक आहे, शरीरात रक्ताचा कारक, शरीराच्या गर्मीने रक्त जलद प्रवाहीत होत असते, तीच गर्मी आणि प्रवाह मंगळ आहे.

मंगळ जेव्हा कुंडलीत शुभ असतो तेव्हा व्यक्तीला खूप मेहनती बनवतो, म्हणून मैदानी खेळांवर मंगळाचा अधिकार आहे. हाच मंगळ कार्याने देशासाठी प्राणाची आहुती देण्याची जिद्ध देतो. मंगळ ग्रहांचा सेनापती आहे, म्हणून उत्तम स्थितीत असलेला मंगळ जातक आर्मी, पोलिसमध्ये कार्यरत होतात. क्रांतिकार व्यक्तींचे मंगळ उत्तम स्थितीत पाहायला मिळतात. मंगळ प्रभावित व्यक्ती स्टेटफॉर्वड असतात, आपल्या मित्रासाठी जीवलग मित्र असतात, जीवाची पर्वा करत नाही.

## जाणून घेऊया रुचक योग कसा बनतो?

मंगळ जेव्हा कुंडलीत केंद्र स्थानात म्हणजे प्रथम, चतुर्थ, सप्तम आणि दशम या स्थानात जेव्हा स्वराशीत मेष, वृच्छिक किंवा आपल्या उच्च राशीत मकरमध्ये स्थित असतो तेव्हा रुचक महापुरुष योग बनतो. रुचक योगाचे नैसर्गिक फळ काय असते, असे जातक स्फूर्तिवान, मजबूत शरीरयष्टीचे असतात. शांतपणे बसून राहणे यांच्या स्वभावत नसते, दया करणे आणि दंड देणे यांना सारखेच असते. रुचक योग व्यक्ती अशा कार्यक्षेत्रात सफल होतात जेथे अति संघर्षाचे काम असते, जेथे शार्फऑब्जेक्टचे काम असते मग डॉक्टर, इंजिनिअर, सर्जन, आर्मी, पोलिस, प्रत्येक सिक्युरिटी सिस्टीम, फॅक्टरी ऑनर्स, फायरबिग्रेट, ॲडमिनिस्टेटर, रुचक योग असलेले जातक उत्तम आणि सफल मॅनेजर होतात.

कुंडलीच्या वेगवेगळ्या केंद्र स्थानात रुचक योगाचे फल वेगवेगळे बनते. प्रथम स्थानात रुचक योग असणारे जातक रिस्क टेकर बनतात, असे जातक घाईगडबडीत राहतात. पण धीरिष्ट आणि निच्छयी असतात.

चथुर्त स्थानी रुचकयोग जातक अशा क्षेत्रात टॉपवर असतात. जेथे त्यांना घरापासून दूर राहावे लागते. जसे- आर्मी.

सप्तम स्थानी रुचकयोग जातक मोठ-मोठ्या कंपनीचे मालक असतात. रात्रंदिवस कामात व्यस्त असतात. दशम स्थानी रुचक योग किंवा येथे मंगळ सर्वात उत्तम मानला आहे. कारण येथे मंगळाला द्रिगबल प्राप्त होते. येथे मंगळ कुलदीपक योग बनवतो, वैवाहिक जीवांनासाठी हा मंगळ मांगळीक दोष बनवत नाही.



## या योगाचे नाव रुचक का आहे?

रुचक हे नाव रुची या शब्दापासून बनला आहे. म्हणजे इच्छा. रुचकयोगाचे जातक ज्या कामात त्यांची इच्छा असते ती कामे उत्तम प्रकारे करतात. म्हणजे असे जातक हाती घेतलेले काम पूर्णच करतात अर्धवट सोडत नाही, म्हणूनच मंगळाला सेनापती म्हटले आहे. युद्धात शेवटपर्यंत उभा राहतो, सर्वात प्रथम जातो आणि शेवटपर्यंत राहतो.

## कुंडलीत रुचक फळ पाहताना कसे पहाल?

कल्पना करा, की आपल्याजवळ चार रुचक योगाच्या कुंडल्या आल्या आहेत, तर चारही जातकांना रुचक योगाचे समान फळ सांगाल का? नाही, तर आपणास कोणकोणत्या गोष्टींवर लक्ष द्यावे लागेल?

१) जेव्हा कुंडलीत रुचक योग बनत असेल किंवा इतर कुठलाही योग बनत असेल तर लग्नेश, सूर्य आणि चंद्र बल पाहणे अत्यावश्यक असते. यांच्याच बळावर कोणताही राजयोग सफल होत असतो.

२) कुंडलीत जेव्हा रुचक योग बनत असेल तर मंगळाचे अंश बल पण नक्कीच पाहावे. मंगळ १० अंशांपासून २० अंशांमध्ये असणे अत्यंत आवश्यक आहे. नाहीतर या रुचक योगाचे पूर्णता फळ प्राप्त होत नाही. जर मंगळ ०२ अंशात किंवा २८-३० अंशात असेल तर हा मंगळ फक्त दिखावा बनतो, अशा स्थितीत मंगळ संबंधित उपाय आवश करावे ज्याने या योगाची रेंज वाढेल.

३) ज्या कुंडलीत रुचक योग आहे त्या कुंडलीत मंगळ कारक ग्रह आहे की अकारक आहे, म्हणजे जर कुठल्याही अशुभ भावाचा स्वामी होत असेल तर अशा वेळी हा रुचक योग जीवनात समस्या वाढवू शकतो, खूप संघर्ष करेल.

४) मंगळ रुचक योग स्थितीत वक्री अवस्थेत असू नये, ग्रहांची वक्री स्थिती पेंडिंग कर्म दर्शवते आणि कॉम्प्लिकेशन वाढवतात अशा स्थितीत फलादेश विचारपूर्वक करावा.

५) वर्ग कुंडलीतील पण मंगळ स्थिती आवश विचारात घ्या. जेवढ्या जास्त वर्ग कुंडलीत मंगळ चांगल्या भावात असेल तेवढाच चांगला प्रभाव रुचक योगाचा मिळेल. खास करून नवमांश आणि दशमांश कुंडलीत मंगळाची स्थिती नक्कीच पाहावी.

## आता जाणून घेऊया रुचक योग केव्हा भंग होतो?

१) जर रुचक योगात मंगळ, रवी बरोबर असेल तर हा योग भंग होतो.

२) जर रवीमुळे मंगळ अस्त होत असेल.

३) कूटच्या इतर ग्रहांबरोबर ०१ अंशाच्या आत असेल तर ही ग्रह युद्ध स्थिती निर्माण होते आणि यात मंगळ कमजोर झाल्यास हा योग भंग होतो.

## रुचक योगाचे फळ जीवनात केव्हा मिळेल?

ज्यांच्या कुंडलीत रुचक योग आहे त्यांना या योगाचे फळ तर जीवन भर प्राप्त होईल पण जेव्हा-जेव्हा मंगळ महादशा येईल अंतर्दशा येईल किंवा गोचरीने मंगळ चंद्र राशी, लग्न, केंद्र भाव किंवा त्रिकोण भावातून गोचर करेल तेव्हा रुचक योगाचे फळ प्राप्त होत राहील.

## रुचक योग जर कमजोर असेल तर उपाय काय कराल?

१) येथे आपण मंगळाच्या प्रवाळ रत्नाचा वापर करून रेंज वाढवू शकता, पण हे सुद्धा एक जहाल रत्न आहे, उत्तम ज्योतिषी मार्गदर्शकाचा सल्ला घ्यावा आणि वापरावा अन्यथा विपरीत परिणाम होऊ शकतो, रक्त दाबाची जर समस्या असेल तर हे रत्न वापरू नहे. हे रत्न जास्त काळ किंवा वर्षान- वर्ष वापरू नहे. अति जास्त रतीचा वापरू नहे.

२) श्रीगणेशांची उपासना करावी, मंगळवारी हनुमंतांची पूजा-अर्चना करावी, तेल आणि शेंदूरांनी अभिषेक करावा.



# ‘मणिरामदास की छावनी’ का क्या इतिहास है?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अयोध्या की सुप्रसिद्ध ‘मणिरामदास की छावनी’ का इतिहास बड़ा ही दिव्य है। स्वामी मणिरामदास जी महाराज एक उच्च कोटि के तपस्वी थे। उनके जीवन की यह कथा सिद्ध करती है कि भक्त के प्रेम के आगे भगवान को भी झुकना पड़ता है।

महाराज जी ने चित्रकूट के घने जंगलों में लगातार १२ वर्षों तक हनुमान जी की कठोर साधना की। उनकी भक्ति से प्रसन्न होकर पवनपुत्र हनुमान जी प्रत्यक्ष प्रकट हुए। हनुमान जी ने उन्हें एक दिव्य मणि भेंट करनी चाही, जो संसार के समस्त ऐश्वर्य दे सकती थी।

किंतु महाराज जी ने बड़ी विनम्रता से उसे अस्वीकार कर दिया और कहा: “प्रभु, मुझे इस पत्थर की मणि की आवश्यकता नहीं है। यदि आप देना ही चाहते हैं, तो स्वयं मेरे साथ चलिए। आपके साथ होने पर मुझे त्रिलोकी के किसी वैभव की लालसा नहीं रहेगी।”

भक्त की निस्वार्थ भावना देख हनुमान जी ने वचन दिया कि वे उनके साथ चलेंगे, किंतु एक विग्रह (मूर्ति) स्वरूप में। उन्होंने कहा कि “मैं कुछ समय पश्चात अयोध्या में एक निश्चित स्थान पर प्रकट होऊंगा और तुम्हारी सेवा स्वीकार करूँगा।” इसके बाद महाराज जी अयोध्या आ गए और सरयू तट के पास एक कुटिया बनाकर रहने लगे। वही स्थान आज ‘मणिरामदास की छावनी’ के रूप में विख्यात है।

कुछ समय बीतने के बाद, एक सेठ अपनी बैलगाड़ी में हनुमान जी की एक विशाल पाषाण प्रतिमा लेकर कहीं जा रहे थे। जैसे ही बैलगाड़ी महाराज जी की कुटिया (छावनी) के सामने पहुँची, अचानक गाड़ी के पहिए की धुरी टूट गई। हनुमान जी का विग्रह सरयू की रेत में गिर गया। सेठ ने गाड़ी ठीक करवाई और कई लोगों की मदद से प्रतिमा को वापस उठाने का प्रयास किया, लेकिन वह विग्रह टस से मस न हुआ। परेशान होकर सेठ ने महाराज जी से कहा:

“बाबा! आपने ऐसा क्या जादू कर दिया कि यह मूर्ति अब हिल भी नहीं रही है?”

महाराज जी को तुरंत चित्रकूट में हनुमान जी द्वारा दिया गया वचन याद आ गया। वे समझ गए कि प्रभु अपने वादे के अनुसार छावनी में निवास करने आ गए हैं। महाराज जी ने भावविभोर होकर हनुमान जी से प्रार्थना की “प्रभु! अब अपना भार हल्का करें और भक्तों पर कृपा करें।”

प्रार्थना करते ही, जो विग्रह कई पुरुषों से नहीं उठ रहा था, वह अत्यंत हल्का हो गया और उसे ससम्मान छावनी में स्थापित किया गया।

महाराज जी और हनुमान जी का संबंध अटूट था। स्वामी जी प्रतिदिन हनुमान जी को श्रीमद् वाल्मीकि रामायण का पाठ सुनाते थे। कहा जाता है कि हनुमान जी साक्षात उपस्थित होकर कथा श्रवण करते थे।

यह परंपरा आज भी ‘मणिरामदास की छावनी’ में जीवित है। वहां आज भी प्रतिदिन हनुमान जी के विग्रह के सम्मुख वाल्मीकि रामायण का पाठ किया जाता है। यह स्थान अयोध्या के प्रमुख संत निवासों और सेवा केंद्रों में से एक माना जाता है।

जय श्रीराम। जय हनुमान॥

# कोहळा कधी, कुठे व कसे बांधावे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कोहळा घरात, दुकानात अथवा व्यवसायाच्या ठिकाणी असणाऱ्या, येणाऱ्या वाईट शक्ती व नजरदोष यापासून सगळ्यांचे रक्षण करण्यासाठी लावला जातो.

**कोहळा बांधण्याचे सविस्तर मार्गदर्शन**

**दिवस आणि वेळ :** अमावास्या किंवा पौर्णिमेच्या दिवशी, विशेषतः सायंकाळी (सूर्यास्तानंतर) कोहळा लावणे शुभ मानले जाते.
**पूर्वतयारी :** कोहळा देठासह असावा. तो स्वच्छ पाण्याने धुवून व पुसून घ्यावा.
**पूजा :** कोहळ्याच्या दोन्ही बाजूंना हळद-कुंकवाने ‘ॐ’ आणि ‘स्वस्तिक’ काढावे आणि त्यावर काजळाने रेघ मारावी.
**बांधण्याची पद्धत :** पूजेनंतर कोहळा लाल वस्त्रात बांधून मुख्य दरवाजाच्या वर किंवा मध्यभागी टांगावा.
**बदलाव :** सहसा हा कोहळा एक वर्ष टिकतो. परंतु खराब झाल्यास पुढील शनिवारी बदलावा. हा उपाय वास्तुदोष निवारण आणि घराच्या संरक्षणासाठी केला जातो.

## कोहळा लावण्याची योग्य पद्धत

कोहळा आणताना देठ असलेला आणावा. आणल्यानंतर कोहळा धुवावा. त्याच्या २ समोरासमोरच्या बाजूला ॐ व स्वस्तिक काढायचे असते. स्वस्तिक कुंकवाने काढावे व ॐ अष्टगंधाने काढावे. त्यानंतर खालपासून वरपर्यंत काजळाने एक रेघ ओढावी. त्यानंतर कोहळा देवाजवळ ठेवून त्याची पूजा करावी. ( हळद, कुंकू, अक्षदा, दिवा, अगरबत्ती ) त्यानंतर प्रार्थना करताना घरात असणाऱ्या, येणाऱ्या वाईट शक्ती व नजरदोष यापासून सगळ्यांचे रक्षण करण्यासाठी प्रार्थना करावी आणि घरात व घराबाहेर ते कोहळे शिंकाळ्यात टांगावे.

कोहळा टांगल्यानंतर कधी-कधी आठ दिवसाच्या आत खराब होतो. कारण अशुभ ऊर्जा सामावण्याची त्याची क्षमता संपलेली असते. अशा वेळी कोहळा सडतो त्यातून पाणी गळते. असे ज्या वेळी होते तेव्हा कोहळा काढून कचऱ्यात टाकून द्यावा. पुन्हा नवीन कोहळा आणून लावावा. कदाचीत सुरवातीला लवकर-लवकर खराब होतो (जर अशुभ ऊर्जा जास्त साठली असेल तर...) नंतर तो एक वर्षभर किंवा त्यापेक्षा जास्त काळ टिकतो. तरी पण जर सोमवती किंवा शनिअमावास्या किंवा दिवाळी अमावास्या यावेळी कोहळा खराब नाही झाला तरी बदलावा.

एरवी जर कोहळा खराब झाला तर त्या पुढील शनिवारी लावावा व एरवी लावताना सुद्धा शनिवारीच लावायचा व नेहमी सूर्यास्त झाल्यानंतरच हा उपाय करावा. कोहळा घरात किंवा व्यवसायाच्या ठिकाणी लावताना त्यावर बाहेरुन आलेल्या लोकांची नजर जायला हवी व बाहेर लावताना बाहेरची व्यक्ती त्याच्या खालून आली पाहिजे. कोहळा टांगल्याने घरात नकारात्मक शक्ती राहत नाही. तसेच बाहेरून येणारी व्यक्ती जर आपल्याशी खूप चांगले बोलत असेल पण मनात आपल्याबद्दल जर ईर्षा बाळगून असेल तर ते मनातील भाव बदलतात व त्याचा परिणाम घरातील व्यक्तीवर होतो. चिडचिड वाढते. व्यवसायात अडचणी येतात. प्रगती होत नाही. तसेच बाहेरची बाधा परिणाम करत नाही. एक



कोहळा घरात दुकानात व एक बाहेर टांगावा म्हणजे बाहेरून येणारी व्यक्ती त्या खालून आली पाहिजे. त्यामुळे कोहळा तेथेच त्या व्यक्तीच्या वाईट विचारावर परिणाम करतो.

## कोहळा कसा बांधावा?

कोहळा शक्यतो अमावास्या (विशेषतः शनी अमावास्या किंवा दिवाळी अमावास्या) किंवा पौर्णिमेला सूर्यास्तानंतर मुख्य दरवाज्यावर बांधावा. हा उपाय नकारात्मक ऊर्जा, नजरदोष आणि वाईट शक्तींपासून रक्षण करण्यासाठी, लाल कापडात गुंडाळून किंवा देठाला धागा बांधून, सर्वांना दिसेल अशा पद्धतीने लावला जातो.

# व्याघ्रपाद ऋषी कोण होते?

## जाणून घ्या भक्तीला एक आदर्श म्हणून कसे स्थापित केले?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एक असे दिव्य नाव, जे तपश्चर्या, त्याग, भक्ती आणि विलक्षण दृढनिश्चयाच्या गाथेचे प्रतीक आहे. सनातन परंपरेत त्यांचे स्थान अत्यंत आदराचे मानले जाते. कारण त्यांनी केवळ भगवान शिव यांची उपासनाच केली नाही, तर भक्तीला एक आदर्श म्हणूनही स्थापित केले.

प्राचीन काळी दक्षिण भारतातील पवित्र वनांमध्ये व्याघ्रपाद ऋषी नावाचे एक महान तपस्वी राहत होते. त्यांचे जीवन साधे, शांत आणि पूर्णपणे भगवान शिव यांच्या उपासनेत लीन होते. रात्रंदिवस त्यांच्या मनात एकच विचार घोळत असे. आपल्या प्रिय भगवान महादेवांना सर्वोत्तम अर्पण कसे करावे? त्यांच्या उपासनेचे वैशिष्ट्य हे होते की ते शिवलिंगाला केवळ तीच फुले अर्पण करत जी पूर्णपणे शुद्ध, ताजी, कोणत्याही कीटकाचा स्पर्श न झालेली आणि पूर्णपणे निष्कलंक असत. त्यांच्यासाठी उपासना हा केवळ एक धार्मिक विधी नव्हता, तर आत्म्याचे अंतिम समर्पण होते. त्यांचा असा विश्वास होता की देवाला केवळ सर्वोत्तमच अर्पण केले पाहिजे. परंतु हे कार्य सोपे नव्हते. ते दररोज घनदाट जंगलात जात असत, जेथे त्यांना उंच झाडे, काटेरी वाटा, अंधारमय परिसर आणि विषारी प्राण्यांची सततची भीती यांचा सामना करावा लागत असे. अनेकदा जखमी व्हायचे, कधी-कधी पडायचे पण त्यांचा निश्चय कधीही डगमगला नाही. त्यांची सर्वांत मोठी वेदना ही होती की फुलापर्यंत पोहोचेपर्यंत त्याला अनेकदा कीटक खात किंवा ते जमिनीवर पडत असे. यामुळे त्यांच्या हृदयाला वेदना होत असत. महादेवांना अर्पण केलेले प्रत्येक फूल पूर्णपणे निष्कलंक असावे, अशी त्यांची इच्छा होती. त्याची निरपेक्ष भक्ती, समर्पण आणि दृढनिश्चय पाहून स्वतः भगवान शिव प्रसन्न झाले. त्यांनी विचार केला, की माझा हा भक्त आपल्या देवतेसाठी इतके कष्ट सहन करत आहे. त्याला अशी शक्ती मिळो, ज्यामुळे त्याची आध्यात्मिक साधना सोपी होईल.



भगवान शिव यांनी त्यांना वाघासारखे शक्तिशाली, वेगवान आणि चपळ पाय प्रदान केले. त्यांचे पाय इतके शक्तिशाली झाले कीते सहजपणे उंच झाडांवर चढू शकत होते जंगलातून वेगाने चालू शकत होते आणि काटेरी झाडे व विषारी प्राण्यांपासून सुरक्षित राहू शकत होते. इतकेच नाही तर त्यांना अंधारातही स्पष्टपणे पाहण्याची शक्ती प्राप्त झाली. ज्यामुळे ते सूर्योदयापूर्वी फुले गोळा करू शकत होते. जेव्हा ती सर्वात ताजी आणि शुद्ध असतात. या दैवी आशीर्वादामुळेच त्यांना ‘व्याघ्रपाद’ हे नाव मिळाले. व्याघ्र म्हणजे वाघ आणि पाद म्हणजे पाय. हे नाव केवळ त्यांच्या शरीराच्या परिवर्तनाचे प्रतीक नाही, तर त्यांच्या भक्तीच्या महानतेची साक्षही देते. हे दर्शवते की जेव्हा एखादा साधक आपल्या ध्येयासाठी पूर्णपणे समर्पित असतो, तेव्हा देव स्वतः त्याला मदत करण्यासाठी निसर्गाचे नियम बदलतो.

व्याघ्रपाद ऋषींच्या कथेतील आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे महान ऋषी पतंजलींशी असलेला त्यांचा संबंध. असे म्हटले जाते, की त्या दोन ऋषींनी मिळून भगवान नटराजांचे दिव्य आनंद तांडव पाहिले. हा तो क्षण होता जेव्हा भक्ती आणि योग यांचा खऱ्या अर्थाने संगम झाला होता. त्यांची भक्ती केवळ कृतीपुरती मर्यादित नव्हती, तर ती त्यांच्या हृदयाच्या खोलवरच्या भागातून उगम पावत होती. त्यांनी प्रत्येक फुलासोबत आपले प्रेम, भक्ती आणि आपल्या आत्म्याचा एक अंश अर्पण केला.

शास्त्रे असेही सांगतात

**नमस्कार शिव, शांताय करुणावतराय ते।**
**नमस्कार प्रणत्पलय नमस्ते विश्वरूपिने।**

**अर्थ :** हे शांतीमय शिव. मी त्या परमेश्वराला, जो करुणेचा सागर असून आपल्या भक्तांचे रक्षण करतो, त्याला पुन्हा पुन्हा वंदन करतो. व्याघ्रपाद ऋषींची कथा आपल्याला शिकवते की भक्तीसाठी सत्य आणि समर्पण आवश्यक आहे, ढोंग नव्हे. जेव्हा एखादा भक्त आपल्या प्रिय व्यक्तीसाठी प्रत्येक कष्ट सहन करण्यास तयार असतो, तेव्हा देव स्वतः त्याचा मार्ग सुकर करतो. त्यांचे वाघासारखे पाय हा संदेश देतात की जो आपल्या ध्येयात दृढ राहतो, त्याच्यासाठी कोणताही अडथळा खूप मोठा नसतो. निसर्ग, परिस्थिती आणि अगदी देव स्वतः अशा भक्ताचे सोबती बनतात. ही कथा केवळ एका ऋषीची नाही, तर आपल्या जीवनात खऱ्या अर्थाने भक्ती जगू इच्छिणाऱ्या प्रत्येक साधकासाठी एक प्रेरणा आहे.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)